**<u>ठळक बातम्या</u>**

- डिजिटल सुरक्षेसाठी थांबा, विचार करा नंतरच मग कृती करा असं प्रधानमंत्री प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं आकाशवाणीवरच्या मन की बात मधून आवाहन

- विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्ष, काँग्रेस तसंच राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवारांची तिसरी यादी जाहीर

- जागतिक उद्योगविश्व भारतात गुंतवणुकीसाठी उत्सुक असल्याचं परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांचं प्रतिपादन

**आणि**

- न्यूझीलंड विरुद्धच्या मालिकेतल्या एकदिवसीय सामन्यात भारतीय महिला संघ पराभवाच्या छायेत

**<><><><><>**

डिजीटल अटक अशी कुठलीही तरतूद कायद्यात नाही, ही फसवणूक आहे. अशा प्रकारची फसवणूक करणारे समाजाचे शत्रू आहेत, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज देशवासियांना केलं. त्यांनी आज आकाशवाणीवरून मन की बात या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा एकशे पंधरावा भाग होता.

यावेळी प्रधानमंत्र्यांनी उदाहरणादाखल डिजीटल अटकेशी संबंधित फसवणूकीच्या फोन कॉलचं ध्वनीमुद्रण श्रोत्यांना ऐकवलं, फसवणूक करणाऱ्यांची कार्यपद्धती आणि अशा वेळी आपण घाबरून न जायची खबरदारी याविषयी देखील त्यांनी श्रोत्यांना समजावलं. या सगळ्याचा प्रतिकार करण्यासाठी अनेक तपास

यंत्रणा आणि राज्य सरकारं परस्पर सहकार्यानं काम करत असून, त्यांच्यातल्या समन्वयासाठी राष्ट्रीय सायबर समन्वय केंद्राची स्थापना केली असल्याची माहिती त्यांनी दिली. अशा घटनांविरोधात नागरिकांनी १९३० या राष्ट्रीय सायबर मदत क्रमांकावर अथवा सायबर क्राइम डॉट जीओव्ही डॉट इन या पोर्टलवर कळवावं अशी माहितीही त्यांनी दिली.

**होल्ड - प्रधानमंत्री तीन पायऱ्या**

देशातलं गेमिंग अवकाशही झपाट्यानं विस्तारत असून भारत एक नवी क्रांती घडवण्याच्या मार्गावर असल्याचं ते म्हणाले. ॲनिमेशन क्षेत्रामुळे भारतीयांची सर्वाधिक निर्मिती असलेल्या व्ही आर अर्थात आभासी पर्यटनालाही मोठी चालना मिळाली असल्याचं त्यांनी सांगितलं. उद्या २८ ऑक्टोबरला जागतिक ॲनिमेशन दिवस साजरा होणार असून, यानिमित्तानं देशाला जागतिक ॲनिमेशन ऊर्जा केंद्र बनवण्याचा संकल्प करायचं आवाहनही त्यांनी केलं. आत्मनिर्भर भारताविषयी बोलताना प्रधानमंत्री म्हणाले.

**होल्ड - आत्मनिर्भर**

देशभरात शारीरिक तंदुरुस्तीविषयी वाढत चाललेल्या जाणिवेच्या उर्जेचा आपल्याला अनुभव येत असल्याचं ते म्हणाले.

भारताच्या कला आणि संस्कृतीबद्दल जगभरात असलेल्या आकर्षणाचाही उल्लेख प्रधानमंत्र्यांनी आजच्या मन की बात मध्ये केला.

**<><><><><>**

राज्यातल्या विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस तसंच काँग्रेस पक्षानं आपापल्या उमेदवारांच्या तिसऱ्या याद्या

जाहीर केल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं कारंजा इथून ज्ञायक पटनी, हिंगणघाटमधून अतुल वांदिले, अणुशक्तीनगर इथून फहाद अहमद, हिंगणा इथून रमेश बंग, चिंचवडमधून राहुल कलाटे आणि परळी विधानसभा मतदारसंघातून राजेसाहेब देशमुख यांना उमेदवारी जाहीर केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसनं गेवराई विधानसभा मतदारसंघातून विजयसिंह पंडित, फलटणमधून सचिन पाटील, निफाडमधून दिलीप बनकर आणि पारनेरमधून काशिनाथ दाते यांना उमेदवारी जाहीर केली आहे. काँग्रेसच्या यादीत १६ नावांचा समावेश आहे. यात दिग्रस मतदारसंघातून माणिकराव ठाकरे यांना, तर अंधेरी पश्चिममधून सचिन सावंत यांना काँग्रेसनं निवडणुकीच्या रिंगणात उतरवलं आहे. कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघातून राजेश लाटकर आणि सांगलीतून पृथ्विराज लाटकर काँग्रेसकडून निवडणूक लढवणार आहेत.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात उद्या रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

गेल्या दहा वर्षात भूमीबंदरांचा जो विकास झाला आहे त्यामुळे शेजारी देशांमधल्या भाषा, संस्कृती आणि साहित्य यांच्या आदानप्रदानात भर पडत आहे असं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज सांगितलं. पश्चिम बंगालमध्ये भारत बांगलादेश सीमेवरच्या पेट्रापोल या भूमिबंदरावर उभारलेल्या ‘मैत्रीद्वार’ या

प्रवेशद्वाराचं तसंच प्रवासी टर्मिनल इमारतीचं उद्घाटन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते आज झालं त्यावेळी ते बोलत होते.

भूमीबंदर प्राधिकरणाचं काम हे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या  समृद्धी, शांतता, भागीदारी आणि विकास या चतुःसुत्रीवर चालत असल्याचं शाह यांनी सांगितलं. बांगलादेशातून दररोज पाच ते सहा हजार  माणसे भारतात वैद्यकीय इलाजासाठी येतात.  भारतीय भूमीबंदर प्राधिकरणाने दिलेल्या या सुविधांमुळे अधिकृतपणे सीमा पार करता येईल. यामुळे अवैधरित्या सीमा ओलांडण्यावर अंकुश येईल असं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

खरीप विपणन हंगाम २०२४-२५ या काळात १८५ लाख मेट्रिक टन तांदूळ खरेदी केला जाईल, असं ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण विभागाचे मंत्री प्रल्हाद जोशी यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलत होते.

तांदूळ गिरणी मालकांच्या तक्रार निवारणासाठी लवकरच ऑनलाईन पोर्टल सुरू केलं जाईल, असं ते म्हणाले.  पोर्टलच्या माध्यमातून तक्रारींचे, तात्काळ निवारण  केलं जाईल, असं ते म्हणाले.

**<><><><>**

जागतिक उद्योगक्षेत्राबरोबरच, जागतिक नेत्यांचाही भारताविषयीचा विश्वास वाढला आहे. जागतिक उद्योगविश्व भारतात गुंतवणुकीसाठी उत्सुक आहे. सुसज्ज सुविधांसोबतच महाराष्ट्र हे भौगोलिकदृष्ट्या गुंतवणुकीसाठी सर्वाधिक योग्य राज्य असल्याची जागतिक उद्योगांची भावना आहे. त्यामुळे विकसित भारत संकल्पनेच्या पूर्ततेमध्ये महाराष्ट्राचा मोठा वाटा आहे,    राज्य आणि केंद्र सरकार जिथे एकत्र

काम करतात, ती उद्योगांची सहाजिकच पहिली पसंती असते, असं प्रतिपादन परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी आज केलं. मुंबईत भाजपा कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. मोदी सरकारच्या तिसऱ्या पर्वात विकसित महाराष्ट्राच्या संकल्पपूर्तीसाठी समर्पितपणे वेगवान काम सुरू असून त्यासाठी महाराष्ट्राचा विकास वेगवान असायलाच हवा. स्वातंत्र्यानंतर उद्योग, तंत्रज्ञान, विमानतळ, रेल्वे वाहतूक, बुद्धिमत्ता, भौगोलिक सुविधा यांमध्ये महाराष्ट्र कायम आघाडीवर राहिला आहे. असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

भारतात मेट्रोचं जगातलं दुसऱ्या क्रमांकचं मोठं जाळं लवकरच निर्माण होईल असं केंद्रीय नागरी व्यवहार मंत्री मनोहरलाल खट्टर यांनी म्हटलं आहे. ते सतराव्या भारतीय नागरी वाहतूक परिषदेच्या समारोपाच्या सत्रात बोलत होते. गांधीनगरमधल्या महात्मा मंदीर इथं झालेल्या या परिषदेत खट्टर यांनी सार्वजनिक वाहतुकीच्या शाश्वत गरजेवर भर दिला.

शाश्वत आणि किफायतशीर वाहतूक व्यवस्थेसाठी सरकारने अनेक उपक्रम गेल्या दहा वर्षात हाती घेतले आहेत असं खट्टर यांनी यावेळी सांगितलं. वाहतूक व्यवस्थेसाठी तंत्रज्ञान, संशोधन हरित उपाय आणि खाजगी- सार्वजनिक भागीदारी याला महत्व आहे असंही खट्टर यांनी सांगितलं. या परिषदेत शहरी वाहतुकीच्या सर्वोत्तम प्रकल्पांना गौरवण्यात आलं. यामध्ये कोची मेट्रो रेल कॉर्पोरेशनला सर्वोत्तम शाश्वत वाहतूक व्यवस्था म्हणून तर भुवनेश्वरला सर्वोत्तम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था तर सूरतला सर्वोत्तम सक्षम वाहतूक व्यवस्था म्हणून गौरवण्यात आलं.

**<><><><><>**

CPCB अर्थात केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळानं दिल्लीतल्या हवेची गुणवत्ता पातळी "अत्यंत खराब" म्हणून वर्गीकृत केली आहे. CPCB नं आज दुपारी एक वाजता राष्ट्रीय राजधानीत AQI अर्थात, हवा गुणवत्ता निर्देशांक ३६० इतका नोंदवला आहे. ३०० ते ४०० या दरम्यानचा निर्देशांक हा ‘अतिशय खराब’ या दर्जाचा मानला जातो.

<><><><><>

पंजाब पोलीसांनी काल रात्री पाकिस्तानातून होत असलेल्या  अमली पदार्थाच्या वाहतुकीचं जाळं उद्ध्वस्त केलं. अमृतसरमध्ये पकडलेल्या अंमली पदार्थांच्या १०५ किलोग्रॅम वजनाच्या कन्साईनमेंटमध्ये सहा पिस्तुलंही होती. पोलिसांनी या प्रकरणी दोघांना अटक केली आहे.

<><><><><>

न्यूझीलंड विरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यात भारतीय महिला संघ पराभवाच्या छायेत आहे. दरम्यान, प्रथम फलंदाजी करत न्यूझीलंडच्या संघानं निर्धारित ५० षटकात नऊ बाद २५९ धावा केल्या. भारताकडून राधा यादवनं चार, दीप्ती शर्मानं दोन, तर सायमा ठाकोर आणि प्रिया मिश्रा यांनी प्रत्येकी एक खेळाडू बाद केला. २६० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताची फलंदाजी ढेपाळली. सामना वाचवण्यासाठी राधा यादव आणि सायमा ठाकूर चिवट झुंज दिली, मात्र सायमा ठाकूर २९ धावांवर बाद झाली.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारतीय संघ ४६ षटकात ९ बाद १८० धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//